सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १९/०५/२०२३

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- ४८४

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.४४५ ते ठराव क्र.४८३ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदर कार्यवृत्तातील ठराव क्र.४६१ मध्ये महाराष्ट्र शासन नगरविकास शासन शुद्धीकरण क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.४२२-ब-३१/नवि-१६ मंत्रालय,मुंबई यांचेकडील दि.२९ मार्च २०२३ मध्ये नमुद केलेनुसार कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका या ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज अशी दुरुस्ती करुन, या दुरुस्तीसह सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा कायम करीत आहे.

सूचक :- श्री.उमेश पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील.

D.P. Surywanshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४८५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

वडर समाजाचे जेष्ठ नेते तथा तत्कालीन नगरपरिषदेचे सन्मा.सदस्य कै.आनंदा शंकर वडर यांचे दि.१० मे २०२३ रोजी आकस्मित दु:खद निधन झाले. ते सर्वोदय शिक्षण संस्थेचे संचालक पदी काम करीत तळागाळातील गरिब विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास मदत केली आहे. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.वर्षा अमर निंबाळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

D/Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४८६

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

श्री.अजय कुलकर्णी रा.मिरज यांचे दि.१७ मे २०२३ रोजी निधन झाले. ते एल.आय.सी.एजंट म्हणून कार्यरत होते. तसेच ते समाजसेवक म्हणून भागात ओळखले जात होते. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.वहिदा अय्याज नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.मदिना ईलाई बारुदवाले

D/Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४८७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंती निमित्त मुंबई सागरी महामार्गास छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्याचे निश्चित केले आहे.

मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब व मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.युवराज सतिश बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

अनुमोदक :- सौ.उर्मिला उदय बेलवलकर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४८८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी मा.खा.शरदचंद्रजी पवार साहेब यांची फेर निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विष्णू आण्णासाहेब माने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान

D/Sumavchi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४२९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

कर्नाटक राज्यामध्ये काँग्रेस पक्षाने निर्विवाद वर्चस्व निर्माण करुन सत्ता स्थापन केली कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्री पदी सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री पदी डी.के.शिवकुमार यांची निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विष्णू आण्णासाहेब माने ठराव सर्वानुमते मंजुर

D/Sunavosh

अनुमोदक :- श्री.शेडजी सुबराव मोहिते महापौर,

प्रशासनीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४१०

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

कर्नाटक राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीस जनतेने भरघोस मताधिक्काने यश मिळवून दिले. निवडणूकीमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या सर्व विजयी उमेदवारांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष शिवदास पाटील

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- ४९१

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच झालेल्या बाजार समितीच्या निवडणूकीत भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, शिवसेना व मित्र पक्षानी मिळून घवघवीत यश मिळविले. या यशात महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकजुटीने प्रचार करुन उत्तुंग विजय मिळविला या उत्तुंग यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४९२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

शनिवार दि.०६/०५/२०२२ रोजी दु.१२.४५ वाजण्याच्या सुमारास मिरज मंगळवार पेठ बेलभाग येथे श्री.सागर दादा गिताजे यांचे रहात्या घरात खाद्यपदार्थ तळत असताना अचानपणे आग लागलेली होती. याची वर्दी अग्निशमन दलास मिळताच त्यांनी सत्वर घटनास्थळी पाहचून गॅस सिलेंडर व इतर साहित्याला लागलेली आग धाडसाने विजवली होती.

अग्निशमन अधिकारी व कर्मचारी (जवान) यांनी अगदी कमी वेळात आगीच्या ठिकाणी पोहचून संभाव्य जास्तीची होणारी जिवीत व वित्तहानी वाचविण्यास मोलाचा हातभार लावला आहे. सदरची अग्निशमन दलाने केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.वर्षा अमर निंबाळकर

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४९३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

कॉमनवेल्थ गेम्स-२०२२ वेटलिफ्टींग खेळ प्रकारातील सांगलीचा रौप्य पदक विजेता कु.संकेत सरगर यास महाराष्ट्र राज्य शासनाचा मानाचा शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार जाहिर झाला आहे. यामुळे सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व संपुर्ण जिल्ह्याच्या नावलौकिकात आणखीन भर पडली आहे.

कु.संकेत सरगर यास शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.वर्षा अमर निंबाळकर

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४९४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सम्राट व्यायाम मंडळाचे खेळाडू प्रसाद धोंडीराम वाजे व प्रथमेश आशिष यादव रा.खणभाग सांगली यांची नुकतीच महाराष्ट्र पोलिस दलात मुंबई येथे झालेल्या भरती मध्ये निवड झाली. त्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.तोफिक हारुण शिकलगार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मयुरेश बाबासो पाटील

D f Shirgaonkar
महापौर,

महानगरपालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४१५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सायकलींग खेळ प्रकारातील कुपवाड शहरातील खेळाडू कु.प्रियांका कारंडे हिला महाराष्ट्र राज्य शासनाचा मानाचा शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार जाहिर झाला आहे. यामुळे संपुर्ण जिल्ह्याचा नावालौकीकात भर पडली आहे. कु.प्रियांका कारंडे हिला शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.शेडजी सुबराव मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विष्णू आण्णासाहेब माने

D/Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४१६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच संपुर्ण महाराष्ट्रात झालेल्या महाराष्ट्र राज्य पालीस भरती २०२३ मध्ये आर.के.स्पोटर्स पालीस भरती प्रशिक्षण केंद्र विश्रामबाग च्या माध्यमातून सांगली जिल्ह्यातील १२३ उमेदवारांनी बाजी मारली या सर्व यशस्वी उमेदवारांना श्री.राहूल वसंत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मोल्याच्या मार्गदर्शना बद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी सुबराव मोहिते

D/Suryavanshi
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४९७

विषय क्रमांक :- ०४

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९६ मधील तरतुदीनुसार स्थायी समिती शिफारशीत केलेले अंदाजपत्रक व त्यामधील तरतुदी या सभेने अवलोकनी घेतले.

मा.स्थायी समिती अंदाज				
तपशील	सन २०२२-२०२३ चे सुधारीत अंदाजपत्रक		सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रक	
मनपा सु.शि. /संभाव्य शिल्लक	१२४४९२१३६२		७२४४१०५०२	
महसुली जमा	३५५२१८१४८६		३६९२२७४१२५	
डेडहेडस जमा	४५८४५३९१०		४९६४८४९८७	
मनपा शिल्केसह जमा		५२५५५५६७५७		**४९१३१६९६१४**
ब- सु.शिल्लक/ संभाव्य शिल्लक	२५०८१३८१९४		१७६२९८७१९४	
भांडवली जमा -ब	७१८०५००००		२१०९३५००००	
ब- शिल्लकेसह जमा		३२२६१८८१९४		**३८७२३३७१९४**
मनपा व ब भांडवली एकुण जमा		८४८१७४४९५१		**८७८५५०६८०८**
महसुली खर्च	२८८१०९०२४५		२९३८८१६३१०	
भांडवली खर्च-अ	१११९६०२१००		१४७५९२५०००	
डेडहेडस खर्च	४५८४५३९१०		४९६४८४९८७	
मनपा एकूण खर्च		४५३११४६२५५		**४९११२२६२९७**
मनपा स. शिल्लक	**७२४४१०५०२**		**१९४३३१७**	
भांडवली खर्च-ब	१४६३२०१०००		३८७०५३३०००	
मनपा व ब भांडवली एकुण खर्च		५९९४३४७२५५		**८७८१७५९२९७**
ब-संभाव्य शिल्लक	**१७६२९८७१९४**		**१८०४१९४**	
मनपा व ब भांडवली संभाव्य शिल्लक		२४८७३९७६९६		**३७४७५११**

मा.आयुक्त व मा.स्थायी समिती यांनी अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या वैशिष्ठपुर्ण बाबी या सभेस भूषणावह असून, अशा सर्व वैशिष्ठपुर्ण बाबी प्रशासनाने सत्वर अमंलात आणाव्यात असे ही सभा सूचित करीत असून, महासभेमध्ये सन्मा.सदस्यांनी सूचना व विकास कामांबाबत केलेल्या मागणीनुसार ही सभा खालील प्रमाणे कमी-जास्त बदल करीत आहे.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- १९/०५/२०२३**

ठराव क्रमांक :- ४९८

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील क्लासिक पार्क येथील सि.स.नं.६७१६/अ/२/१७ या ओपन स्पेसमध्ये विकसीत करणेत येणार असलेल्या पार्कला कै.माजी मंत्री मदनभाऊ पाटील पार्क असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.सैनुद्दीन नागवान

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ४९९

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली पद्माळे रोड (पद्माळ फाटा) येथील महानगरपालिका हद्दीतील स.नं.३१ ब/२ या क्षेत्रातील रहिवाशी भागास लक्ष्मी कॉलनी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ५००

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,मिरज) यांचे दि.१०/०५/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज किसान चौक येथील सभा स्टेज इमारत बऱ्याच वर्षापुर्वीची जुनी असून, ती धोकादायक झालेने सदरची इमारत पाडणेस ही सभा मान्यता देत असून, सदर ठिकाणी नविन सभा स्टेज इमारत बांधकाम करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन नागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील

D.P.Suryavarshi
महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ५०१

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१२/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील शाळा क्र.१ समोरील पे-ॲन्ड पार्किंग पोटी भरण्यात येणाऱ्या रक्कमेमध्ये लॉकडाऊन काळातील सवलत देणेसाठी मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार कोविड १९ च्या महामारीमुळे सर्वच व्यवसाय बंद अथवा काही प्रमाणात सुरु असल्यामुळे सर्वच व्यापाऱ्यांना प्रचंड आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागले आहे. सदर पार्किंगच्या ठिकाणी सुद्धा वाहनांची वर्दळ कमी प्रमाणात होती. या बाबीचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन सदर मक्तेदाराकडून महापालिकेस भरण्यात येणाऱ्या रक्कमेमध्ये विषयपत्रातील नमुद कालावधीसाठी सवलत देण्यास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०२३

ठराव क्रमांक :- ५०२

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.१९/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील छत्रपती शिवाजी महाराज रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या खाजगी व इतर मिळकतींच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेस व भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार अंतिम निवाड्याची रक्कमेबाबत निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरचा रस्ता महापालिकेच्या ताब्यात नसलेने महापालिकेने रोख स्वरुपात नुकसान भरपाई देणे उचित होणार नाही असे या सभेचे मत असून, सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे. तथापि, TDR अथवा FSI स्वरुपात नुकसान भरपाई भूमीधारकांने मागणी केल्यास ती देणेबाबत ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील. महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका